# मुंबई विद्यापीठ

संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ याचे
कार्यालय, विद्यानगरी परिसर मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई–४०००९८.

## परिपत्रक

DBoEE/ICC/2023-24/7

विद्यापीठाशी सलंग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य /संस्थाचे संचालक, विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख/संचालक, सर ज.जी. वास्तूशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, स्कुल ऑफ इंजिनियरींग ॲन्ड अप्लाईड सायन्स, कल्याण उपपरीसर यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षा विद्यापीठाकडून नेमण्यात आलेल्या विविध परीक्षां केंद्रावर घेण्यात येतात. सदर परीक्षांचे आयोजन करतांना असे निदर्शनास आलेले आहे की, विद्यार्थी परीक्षेदरम्यान त्यांच्या उत्तरपुस्तिकेवर भरण्यात येणारी माहिती (उदा. बार कोड नंबर, परीक्षेचा सीट नं. QP Code इत्यादी ) भरतांना चुका करतात (wrong bubbling). सदर माहिती विद्यार्थ्यांनी योग्य रीतीने भरली आहे किंवा नाही याची खातरजमा करण्याची जबाबदारी पुर्णपणे परीक्षा केंद्रात उपस्थितीत Block Supervisor व Chief Conductor यांची असते. विद्यार्थ्यांनी उत्तरपुस्तिकेवर चुकीची माहिती भरल्यास त्याचा परीणाम परीक्षांचे निकाल जाहिर करण्यावर होत असतो.

विद्यार्थ्यांनी उत्तरपुस्तिकेवर चुकीची माहिती भरल्यामुळे निकाल जाहिर करण्यास दिरंगाई होत असते, तसेच काही विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवावे लागतात ही बाब अतिशय गंभीर स्वरूपाची असून परीक्षा विभागाने याची गांभीर्याने नोंद घेतलेली आहे.

आगामी काळात होणाऱ्या परीक्षांसाठी Block Supervisor व Chief Conductor यांनी परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांनी उत्तरपुस्तिकेवरील माहिती योग्य रीतीने भरली आहे किंवा नाही याची योग्य पद्धतीने खातरजमा करावी. विद्यार्थ्यांनी उत्तरपुस्तिकेवर भरलेली माहिती चुकीची आढळल्यास संबधित Block Supervisor व Chief Conductor यांच्यावर विद्यापीठ प्रशासनाकडून कडक कारवाई करण्यात येईल यांची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/विभाग प्रमुख यांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपल्या महाविद्यालयांतील/विभागातील Block Supervisor, Chief Conductor व संबधित अधिकारी/कर्मचारी यांची बैठक आयोजित करून उत्तरपुस्तिकेवरील माहिती विद्यार्थ्यांकडून चुकीची भरली जाणार नाही याची काळजी घेण्यासाठी प्रशिक्षण दयावे किंवा मार्गदर्शन करावे.

स्थळ : मुंबई
दिनांक ०७/०८/२०२३

(डॉ. प्रसाद कारंडे)
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रती,

१) विद्यापीठाशी सलंग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य /संस्थाचे संचालक, विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभाग प्रमुख/संचालक, सर ज.जी. वास्तूशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, स्कुल ऑफ इंजिनियरींग ॲन्ड अप्लाईड सायन्स, कल्याण उपपरीसर

प्रत महितीस्तव

१) उपकुलसचिव, केद्रिंय मूल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग मुंबई विद्यापीठ.

२) उपकुलसचिव, निकाल, परीक्षा विभाग मुंबई विद्यापीठ.